दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक १८ • MAHMAR/2006/17212 • रायगड • मंगळवार दि.१९ एप्रिल २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## ॲड. गुणरत्न सदावर्तेंना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

**सातारा : वृत्तसंस्था**

सातारा पोलिसांच्या अटकेत असलेले ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना सातारा सत्र न्यायालयाने १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्या मुंबईतील सिल्व्हर ओक या घरावर हल्ला झाल्याप्रकरणी, तसेच कोल्हापूर आणि सोलापूरच्या छत्रपतींबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी ॲड. सदावर्ते यांना सातारा पोलिसांनी अटक केली आहे.

आज सातारा सत्र न्यायालयात सातारा पोलिसांनी सदावर्तेंना २ दिवसांची पोलीस कोठडी मिळावी अशी जोरकसपणे मागणी केली. मात्र सातारा पोलिसांची ही मागणी न्यायालयाने फेटाळून लावत सदावर्तेंना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. सातारा पोलिसांच्या ताब्यात असलेले ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना आता मुंबईला आणण्यात येणार आहे. मुंबईत त्यांना आर्थर रोड कारागृहात ठेवण्यात येईल अशी माहिती मिळत आहे.

## सत्ताधाऱ्यांनी बोलल्याप्रमाणे राजीनामे द्यावेत

# आम्ही मालमत्ता कर कमी करून दाखवू : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत अर्थसंकल्पावर चर्चा होत असताना दुहेरी मालमत्ता कराचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला. अर्थसंकल्पामध्ये ८ क्रमांकाच्या तरतुदीत २५० कोटी रुपये कराच्या स्वरुपात अधोरेखित केलेले आहेत. ही तरतूद म्हणजे कराचा बोजा लादून केलेली वसुली असेल अशी भूमिका घेत महाविकास आघाडीच्या स्थायी समितीमधील सदस्यांनी या तरतुदीस विरोध दर्शविला. अखेरीस हा मुद्दा मतास टाकण्यात आला. बहुमताच्या जोरावर सत्ताधाऱ्यांनी ही तरतूद मंजूर करवून घेतली. याबाबत प्रसिद्धिमाध्यमांशी संवाद साधताना विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे म्हणाले की वाढीव मालमत्ता कराच्या मुद्यावर सत्ताधारी नगरसेवकांनी राजीनामे देण्याच्या वल्गना केल्या आहेत, मी त्यांना आव्हान देतो, तुम्ही बोलल्याप्रमाणे राजीनामे द्या वाढीव मालमत्ता कर आम्ही कमी करून दाखवू.**

प्रसिद्धीमाध्यमांना सत्ताधाऱ्यांचा दुटप्पीपणा सांगण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत प्रीतम म्हात्रे यांच्यासमवेत शेतकरी कामगार पक्षाचे पन-वेल शहर जिल्हा चिटणीस नगरसेवक गणेश कडू, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष नगरसेवक सतीश पाटील, नगरसेवक रवींद्र भगत, नगरसेवक विष्णू जोशी, नगरसेवक अरविंद म्हात्रे, युवा नेता किरण दाभणे उपस्थित होते

महाविकासआघाडी च्या वतीने सांगण्यात आले की वाढीव मालमत्ता कर कमी करण्यासाठी आम्ही रस्त्यावरची लढाई देखील लढत आहोत आणि शासकीय लढाई देखील लढत आहोत. आमदार बाळाराम पाटील, आमदार जयंत पाटील,आमदार अनिकेत तटकरे यांनी हा मुद्दा महाराष्ट्राच्या विधान परिषदेत अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडला आहे. दुहेरी मालमत्ता कराचा बोजा हा सिडकोने विकसित केलेल्या वसाहतींमधील नागरिकांच्या डोक्यावरती लादला जात आहे. आज झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये सर्विस चार्ज आणि सर्विस टॅक्स यातील फरक देखील सत्ताधारी नगरसेवक समजून घेण्याच्या मानसिक परिस्थितीत नव्हते. मुळात २०२३ पर्यंत मालमत्ता करावर शास्ती लावली जाणार नाही असे आयुक्तांचे आदेश असून देखील, पुन्हा एकदा आयुक्त कार्यालयातून शुद्धिपत्रक काढून हा कालखंड एक वर्षाने कमी करण्याचे प्रयोजन नेमके काय? हे नागरिकांना सांगणे गरजेचे आहे.

आज वाढीव मालमत्ता कर ३० टक्के कमी करावा लागला हा देखील महा विकास आघाडीच्या नगरसेवकांनी दिलेल्या लढ्याचा परिपाक आहे. वेळ प्रसंगी आम्ही निलंबनाच्या कारवाईला देखील सामोरे गेलो. आमचे नेते खासदार सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती ताई तटकरे,आमदार बाळाराम पाटील, शिवसेना सल्लागार बबन दादा पाटील, काँग्रेसचे पनवेल शहर जिल्हा अध्यक्ष भाई आर सी घरत, नगरसेवक सतीश पाटील यांच्या माध्यमातून आम्ही नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे तसेच उप मुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे वाढीव मालमत्ता कर कमी करण्यासाठी प्रयत्न करत आहोत.

मालमत्ता करा वरील शास्ती न घेणे ही काळाची

> आमचा अर्थसंकल्पाला विरोध नाही, पनवेल नगरपरिषदेची जुनी हद्द, महानगरपालिकेत समाविष्ट झालेला ग्रामीण विभाग येथून करसंकलन होतच आहे. सिडकोने विकसित केलेल्या नोट्स मध्ये दुहेरी मालमत्ता कराचा प्रश्न समस्या बनून राहिला आहे. अर्थसंकल्पामध्ये अधोरेखित केलेल्या २५० करोड रुपयांच्या मालमत्ता करातून निर्माण होणाऱ्या तरतुदींमध्ये ४० टक्के सूट अपेक्षित आहे. आज जमा झालेल्या कराचे विश्लेषण केले तर जुने नगर परिषद क्षेत्र, औद्योगिक वसाहत, आणि ग्रामीण विभाग येथून करसंकलन होत आहे. परंतु जमा होणारा कर सिडको वसाहतीमधील नागरिक भरत आहेत असे आभासी चित्र निर्माण करून नागरिकांची दिशाभूल केली जात आहे.



गरज आहे. आज कोरोना विषाणूच्या मुळे लादल्या गेलेल्या लॉक डाऊन मुळे प्रत्येकाचे कंबरडे मोडले आहे. विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी वेळोवेळी तशी मागणी केली आहे. परंतु अशा प्रकारे मालमत्ता कर कमी करण्यासाठी सत्ताधारी नगरसेवक कुठेही पुढे येताना दिसत नाहीत. गुपचूपपणे नागरिकांना सांगतात कर भरू नका आणि सभागृहात मात्र कर वसूल करणे याला दुजोरा देतात. अशा प्रकारे सत्ताधारी नगरसेवक अत्यंत दुटप्पी धोरण अंगी बाळगून आहेत. आज हे सत्ताधारी बोंबा मारत आ-हेत की हा विषय राज्य सरकारने हाताळावा. परंतु दुहेरी मालमत्ता कर जेव्हा लागला तेव्हा दिल्लीपासून गल्लीपर्यंत यांची सत्ता होती. असे असतानाही यांच्या ४६ नगरसेवकांनी दुहेरी मालमत्ता कराला दुजोरा का म्हणून दिला?

आमचे म्हणणे आहे की १०५ वर्ग किमी च्या या क्षेत्राला वाजवी मालमत्ता कर आकारावा. परंतु सत्ताधाऱ्यांचा हा मानस आहे की घिसाडघाईने मालमत्ता कर लावायचा, जमलेल्या गंगाजळीत विकासकामं काढायची, आणि ती कामं यांनीच मिळवायची.

> समितीमधील सत्ताधारी नगरसेवकांचे फोन सातत्याने खणखणत असून कोणीतरी फोन ए फ्रेंड त्यांना बैठक कशी चालवावी याबाबत मार्गदर्शन करत होतं. विरोधी पक्ष नेते प्रीतम म्हात्रे यांनी आखरी सदस्यांना ठणकावले, कोण आहे तो वारंवार फोन करणारा? असे खडसावून विचारल्यानंतर फोन लपवताना सत्ताधारी सदस्यांची भंबेरी उडाली होती.

## दोघाजणांचे दागिने खेचून मोटरसायकलवर चोरटे पसार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका महिलेसह एका इसमाच्या गळ्यातील सोन्याचे दागिने खेचून मोटारसायकलीवरून पसार झाल्याची घटना पनवेल शहर व कोपरा गाव येथे घडली आहे.

पनवेल शहरातील सिझलर हॉटेलसमोरून सौ.मनीषा मोर (वय ४४ वर्षे) या रस्त्याने पायी चालत जात असताना मोटारसायकलीवरून आलेल्या दोघांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील ३७,५०० रुपये किमतीचे सोन्याचे मिनी मंगळसूत्र खेचून पसार झाले आहेत याबाबत घटनेची नोंद पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

तर दुसऱ्या घटनेत कोपरा गाव सेक्टर १० परिसरातून समीर ठाकूर हे फेरफटका मारत असताना मोटारसायकलीवरून आलेल्या दोघांपैकी एका इसमाने सोन्याची चैन खेचून ते पसार झाले आहेत. या घटनेची नोंद खारघर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

## कोकण विभागात एस.टी. सेवा पूर्ववत

### ४ हजार ९१० पेक्षा अधिक कर्मचारी संप सोडून कामावर हजर

**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोकण विभगातील ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि पालघर या चार जिल्ह्यांतील आगारांत मिळून ४ हजार ९१० पेक्षा अधिक कर्मचारी संप सोडून कामावर हजर झाले आहेत. ५० टक्क्याहून अधिक एस.टी. वाहतूक सुरु झाली आहे. अशी माहिती महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन अर्थात एस.टी. महामंडळाने दिली.



२८ ऑक्टोबर २०२१पासून राज्यातील जवळपास ९२ हजार एस.टी. कर्मचाऱ्यांनी संप पुकारला होता. संपामुळे राज्यातील एस.टी. सेवा ठप्प झाली होती. दि. ८ एप्रिल २०२२ ते १८ एप्रिल २०२२ या कालावधीत कोकण विभागाच्या ठाणे जिल्ह्यातील आगारांत १ हजार ४२५, रायगड जिल्ह्यातील आगारांत १ हजार ६४४, रत्नागिरी जिल्ह्यातील आगारांत १ हजार १२५ आणि पालघर जिल्ह्यातील आगारांत ७१६ कर्मचारी संपसोडून कमावर हजर झाले आहेत. कोकणात लवकरच शंभर टक्के एस.टी. वाहतूक सुरु होईल, असे आगार प्रमुखांकडून सांगण्यात आले आहे.

## संक्षिप्त...

### मलिकांना दिलासा नाहीच ; कोठडीत वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कुख्यात गुंड दाऊद इब्राहिम, त्याचे कुटुंबीय आणि टोळीतील सदस्यांसंबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेले राज्याचे मंत्री नवाब मलिक यांचा कारागृहातील मुक्काम आणखी वाढला आहे. मुंबईतील विशेष पीएमएलए कोर्टाने मलिक यांच्या न्यायालयीन कोठडीत आता २२ एप्रिलपर्यंत वाढ केली आहे. यापूर्वी त्यांना १८ एप्रिलपर्यंत कोठडी सुनावण्यात आली होती. त्यामुळे, मलिक यांना आणखी १० दिवस कोठडीतच राहावे लागणार आहे.


ईडीने २३ फेब्रुवारीला मलिक यांच्यावर अटकेची कारवाई केली आहे. यामध्ये त्यांना २१ मार्चपर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावत त्यांची रवानगी आर्थर रोड कारागृहात करण्यात आली होती. त्यानंतर मलिकांच्या कोठडीत ४ एप्रिलपर्यंत वाढ करण्यात आली होती. त्यानंतर, १८ एप्रिलपर्यंत वाढ करण्यात आली. आता, पुन्हा एकदा मलिकांना दिलासा देण्यास कोर्टाने नकार दिला आहे.

**पाहिजेत**

मराठी, इंग्रजी टायपिंगचे तसेच इंटरनेट ज्ञान असलेले मुले-मुली पाहिजेत.

: संपर्क :
९७६९०११६६७

## शिवाजीराजांच्या गडकिल्ल्यांचे संवर्धन, पहिल्या टप्प्यात आठ मंदिरांचा जीर्णोद्धार : मुख्यमंत्री उद्धव ठाकरे



**दै.रायगड नगरी । मुंबई**

मंदिर, गड-किल्ले आणि संरक्षित स्मारके यांच्या जतन आणि संवर्धनाचे काम करतांना त्यांचे मूळ रुप, स्थान महात्म्य आणि इतिहास लक्षात घेऊन केले जावे, असे करताना हे काम शास्त्रोक्त पद्धतीने व कालबद्धरित्या करण्यात येईल याचीही काळजी घेण्यात यावी, असे निर्देश मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिले. 'मुख्यमंत्री संकल्पकक्ष'च्या माध्यमातून विविध विभागांच्या २५ योजनांचा आपण स्वत: पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. पहिल्या टप्पात आठ मंदिरांचा जीर्णोद्धार तर सहा गडकिल्ल्यांचं संवर्धन होणार आहे.

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांस्कृतिक कार्य विभागाच्या विविध विषयांचा आज आढावा घेतला. यामध्ये प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार, नवीन लेण्यांच्या अनुषंगाने .../२

> मुख्यमंत्र्यांनी राजगड, तोरणा, शिवनेरी, सुधागड, विजयदुर्ग व सिंधुदर्ग या सहा गडकिल्ल्यांच्या जतन आणि संवर्धन कामाच्या प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी ते म्हणाले की, किल्ल्यांचा विकास हा किल्ल्यांचे पावित्र्य राखून मूळ स्वरूपात व्हायला हवा. यासाठी निश्चित करण्यात आलेल्या वास्तू विशारदकांनी किल्ल्यांचा संवर्धन आराखडा येत्या तीन महिन्यात सादर करावा. या आराखड्यामध्ये किल्ल्यांचे संवर्धन कशा पद्धतीने करण्यात येणार आहे याची माहिती द्यावी. वास्तू विशारदांनी जलदुर्गासह, किल्ल्यांचा इतिहास समजून घेऊन, तिथल्या भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करून हे आराखडे तयार करावेत. यासंदर्भात दुर्गप्रेमी संघटनांची बैठक पुन्हा एकदा आयोजित करावी. तसेच या संघटनांकडे त्यांच्या क्षेत्रातील गड किल्ल्यांची स्वच्छता राखण्याचे काम देण्याबाबतही विचार केला जावा, असंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

## मोटारसायकल अपघातात एकाचा मृत्यू एक गंभीर

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुड येथे दत्तवाडी परिसरात शिघ्रे येथील दोन युवकांचा मोटरसायकल अपघात झाला. या अपघातामध्ये एकाचा जागीच मृत्यू झाला व एक गंभीर जखमी झाला आहे. सदरची घटना घडतात दोघांनाही नजीकच्या ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या दोघांना उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात नेले असता तातडीने उपचार करत असताना त्यातील एकाचा जागीच मृत्यू झाला असल्याचे वैद्यकीय अधिकारी वैद्यकीय अधिकारी विजय हाडबे यांनी सांगितले. त्यातील एकावर उपचार सुरू असून तोही गंभीर जखमी असल्याचे सांगितले. मृत्यू झालेल्या युवकाचे अतिश नंदकुमार मिसाळ वय २२ वर्षे असे नाव आहे. व जखमी झालेला युवक धोंडू अशोक पाटील वय ३५ वर्षे असे नाव आहे. मोटारसायकल अपघातातील गंभीर रुग्ण अशोक धोंडू पाटील याला अलिबाग जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले आहे.



## मुरूडच्या मच्छीमारांवर अस्मानी, पर्ससीन, एलईडी नंतर जेलिफिशचे अरिष्ट

### मुरूड- एकदरा येथील ६० नौकांची मासेमारी ठप्प ; उपासमारीचे संकट



**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरूडच्या मच्छीमारांवर आधी अस्मानी संकट, पर्ससीन, एल इ डी मासेमारी संकट नाही संपत तोच जेलीफिश चे अरिष्ट आले असून मुरूड आणि एकदरा येथील मासेमारी पुन्हा ठप्प झाल्याची माहिती मुरूड कोळी समाजाचे अध्यक्ष मनोहर बैले, यांनी सोमवारी बोलताना दिली. या प्रसंगी जेष्ठ मच्छीमार मनोहर मकू, आणि मच्छीमार बांधव उपस्थित होते. मुरूड आणि एकदरा येथील सुमारे ६० नौका दररोज डिझेल खर्चून मासेमारीस जातात; परंतु रिकाम्या हाताने परत येत आहेत. गेल्या महिन्यापासून ५० टक्के नौका समुद्र किनाऱ्यावर नांगर टाकून उभ्या आहेत. प्रत्यक्षात मासळीची फार भीषण स्थिती आहे. त्यामुळे नौका किनाऱ्यावर शाकारण्याच्या तयारीत मच्छीमार आहे. त्यात १जून पासून पावसाळी मासेमारी पुढील दोन महिने बंद राहणार आहे.

तीन महिन्या पूर्वी समुद्रात जेलिफिश आल्याने मासेमारी ठप्प होती. समुद्रात मासळी ऐवजी जेलिफिश आधिक मिळत होती. आताही तीच परिस्थिती उदभवली असून मासळी ऐवजी जेलिफिश ७० टक्के मिळत असून जेलिफिश च्या स्पर्शाने अंगाची लाहीलाही होत असल्याची माहिती मच्छीमारांनी दिली आहे.

या वर्षात अवकाळी पाऊस, वादळी हवामान, वाढते प्रदूषण बेकायदेशीर पर्ससीन एल इ डी मासेमारी यामुळे मासळीचा दुष्काळ सातत्याने होता. यातच जेलिफिश चे संकट दोन वेळा आले आहे. आता याचा भागात जेलिफिश मोठ्या प्रमाणात आल्याने मासे न मिळाल्याने जेलिफिश प्रचंड प्रमाणात सापडत असून यांच्या स्पर्शाने अंगाची लाहीलाही होत असल्याची माहिती अनेक मच्छीमारांनी सोमवारी बोलताना .../२

# ये रे माझ्या मागल्या...

'अशी ही हिरकणी... शोधी तळाशी पाणी' या शीर्षकाचे, पाणीटंचाईची भीषणता दाखविणारे छायाचित्र 'महाराष्ट्र टाइम्स'ने नुकतेच प्रसिद्ध केले आणि सर्वत्र खळबळ उडाली. एके काळी महाराष्ट्राच्या चेरापुंजीचा मान मिळविणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर-इगतपुरी तालुक्यातील ही दुरवस्था पाहून कोणाचेही मन द्रवले असेल; तसे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांचेही द्रवले. त्यांनी लागलीच काही उपाययोजना सांगितल्या. संबंधित गावामधीलच इतर विहिरींमधील पाणी पुरविण्याची सोय करण्याबाबत शासकीय अधिकारी प्रयत्नशील होते; पण हाय रे दैवा, त्यासाठी वीज हवी. ग्रामीण भागात विजेचा खेळखंडोबा पाचवीला पुजलेला. अशात सध्या वीजसंकटाने संपूर्ण महाराष्ट्राला ग्रासलेले. वयाच्या बासष्टीतील महाराष्ट्र आणि पंचाहत्तरीतील भारत, यांचे हे विदारक दर्शन विश्वगुरू बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना वास्तवाची जाण व भान यायला पुरेसे ठरावे. या वर्षी पर्जन्यमान सरासरीहून अधिक झाले. जवळपास बाराही महिने पावसाने हजेरी लावली. या अवकाळीचा पिकांना फटका बसला, तसा कोळसा खाणींनाही बसला. खाणींमध्ये पाणी शिरल्याने कोळसा भिजला. आता कोळशाची टंचाई ही औष्णिक केंद्रांच्या वीजनिर्मितीत मोठाच अडथळा बनली आहे. याशिवाय, प्रचंड प्रमाणातील वीजगळती, वीजचोरी, कोट्यवधींची थकबाकी, देखभाल-दुरुस्ती अशा काही मानवी कारणांमुळे दिवसेंदिवस विजेची समस्या गंभीर रूप धारण करीत होती. या काळात सरकार-प्रशासन काय करीत होते, हा प्रश्न सामान्यांना पडला, तर त्यांना दोष कसा देता येईल? तहान लागल्यावर विहीर खोदण्याची प्रवृत्ती धोरणकर्त्यांच्या मनीमानसी रुजलेली आहे. साहजिकच, आता कोळसा आहे तर रेल्वेची रॅक नाही आणि रॅक आहे तर कोळसा नाही, अशी कारणे दिली जात आहेत. आंध्र प्रदेश व गुजरातलाही या संकटाचा फटका बसला असून, तेथेही पन्नास टक्के औद्योगिक ग्राहकांची वीजकपात चालू असावी. महाराष्ट्रासारख्या औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्याला अशी कपात परवडणारी नाही. तसा प्रयोग करण्याचा प्रयत्नही अंगाशी येईल; त्यामुळेच इतर राज्यांचे उदाहरण तोंडी लावण्यापुरतेच ठेवलेले बरे. रोजची वीज मागणी साधारण २५ हजार मेगावॉटवर पोहोचलेली असताना, तब्बल एक ते तीन हजार मेगावॉट विजेचा तुटवडा एप्रिलच्या मध्यास जाणवतो आहे. दोन दिवस पुरेल एवढाच कोळसा हाताशी आहे. हे म्हणजे दात कोरून पोट भरण्यासारखे आहे. खासगी कंपन्या; तसेच इतर राज्यांकडून चढ्या दराने वीज खरेदी करून समस्येवर मात करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करीत असले, तरी त्यासाठी लागणारे द्रव्यदेखील पुरेसे नसल्याने, महागडी वीज खरेदी करून मागणी व पुरवठ्याची तोंडमिळवणी करणे अवघड बनले आहे. नेमका याच वेळी उरण येथील वीज प्रकल्पाला पुरेसा गॅस न मिळणे, म्हणजे दुष्काळात तेरावा महिना. सोमय्या-राऊत कलगीतुऱ्यात दंग असलेल्या या प्रगत राज्याला किमान गरजेच्या गोष्टींसाठीही किती यातायात करावी लागते आहे हे पाहिल्यावर, सरकारचे प्राधान्यक्रमही चुकत चालल्याचे दिसते आहे. ऊर्जामंत्री नितीन राऊत तर हे संकट आगामी सहा महिन्यांपर्यंत राहू शकते, असा बागुलबुवा उभा करीत आहेत. पुरेशा वीजनिर्मितीअभावी वीजगळती, चोरी व थकबाकी असलेल्या भागात भारनियमनाचा पहिला दणका बसला आहेच. आता भर उन्हाळ्यात जिवाची काहिली होत असताना, अघोषित भारनियमनामुळे वेळेवर वीजबिले भरणाऱ्यांनाही त्रास होत आहे. वीजसंकट आजचे नाही. वाढत्या नागरीकरणाबरोबर वीजनिर्मिती संच वाढविण्याकडे पूर्वीपासूनच गांभीर्याने लक्ष दिले गेले नाही. एन्रॉन प्रकल्प समुद्रात बुडवायला आनंद वाटला. असल्या पायाकडे पाहण्याच्या प्रवृत्तीमुळे झालेले नुकसान भरून येणारे नाही. वीजसंकट असे घोंघावत असतानाच हळूहळू का होईना; पण दुष्काळ व पाणीटंचाईची समस्याही पुढे येत आहे. आजमितीस ६९ गावे व १०५ वाड्या-वस्त्यांवर ४३ टँकरने पाणीपुरवठा केला जात आहे. गेल्या वर्षीपेक्षा हे प्रमाण निम्म्याहून कमी असले, तरी त्यात समाधान मानावे, अशी स्थिती नाही. सर्वाधिक ३४ टँकर हे कोकणातील रायगड व पालघर जिल्ह्यात आहेत. ही आकडेवारी हा आपल्या नियोजनाचा आरसा समजावा लागेल. राज्यातील सर्वच आदिवासी पट्ट्यांत; तसेच दुर्गम, डोंगरी भागात पाण्याचे दुर्भिक्ष्य ही दर वर्षीची समस्या बनली आहे. त्यावर मात करण्यासाठी आजवर हजारो कोटी रुपये खर्ची पडले; परंतु शाश्वत उपाय सापडला नाही. आताही महिलांनी विहिरीत उतरून पाणी भरू नये, यासाठी त्यावर लोखंडी जाळ्या बसविण्याची क्लृप्ती सनदी अधिकाऱ्यांना सुचत असेल, तर अशा संवेदनाहीन व विधिनिषेधशून्य व्यवस्थेच्याच पुनर्रचनेची गरज अधोरेखित होते. भूतकाळातून आपण काहीच शिकलो नाही. बोलघेवडेपणा बंद करून संयम व निर्धाराने या संकटांकडे आताच लक्ष दिले नाही, तर भविष्य नक्कीच अंधकारमय असेल.

# अक्षयतृतीयेला माथेरानमध्ये अवतरणार शिवशाही

**दै.रायगड नगरी । माथेरान**

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला पवित्र दिवस म्हणजे अर्थातच अक्षयतृतीया. आणि याच दिवशी समस्त माथेरान करांच्या वतीने,शिवसेनेचे शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली, महिला आघाडीच्या सहकार्याने, युवा सेना, युवती सेनेच्या सोबतीने, माजी लोकप्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली, जेष्ठ शिवसैनिकांच्या सल्ल्याने अक्षयतृतीयेला तिथीनुसार शिवजयंती उत्सव मोठया उत्साहात संपन्न करण्यासाठी आतापासूनच तयारी सुरू झाली आहे.



याकामी शिवसेनेच्या पदाधिका-यांची एक विशेष बैठक शिवसेना शाखेत शहरप्रमुख चंद्रकांत चौधरी यांनी आयोजित केली होती. यावेळी उप शहरप्रमुख प्रमोदशेठ नायक, महिला संघटिका संगीता जांभळे, युवा सेना अधिकारी निमेश मेहता, युवती सेना अधिकारी माधुरी बिरामणे, अंकिता तोरणे, श्रुतिका दाभेकर, जयश्री कदम, अर्चना बिरामणे, सागरिका कदम, निधी जाधव, जोती बिरामणे, मेघा कोतवाल, शलाका शे-लार, जेष्ठ शिवसैनिक ज्ञानेश्वर बागडे, बाबू सुतार, अवधूत येरफुले, प्रकाश सुतार, योगेश जाधव, युवा सेनेचे निखिल शिंदे, गौरंग वाघेला, वसंत कदम, शैलेश वाघेला, अनिकेत जाधव, प्रसिद्धी प्रमुख अमोल चौगुले, आदी उपस्थित होते.

दोन वर्षांच्या कोरोनाच्या महामारीमुळे कोणत्याही प्रकारे सण साजरे करता आले नाहीत. नुकताच कोरोनाचे निर्बंध शिथिल केल्यामुळे सर्वधर्मीय आपापले सण, उत्सव साजरे करीत आहेत. त्यामुळे यंदा अक्षयतृतीयेला शिवजयंती मोठया उत्साहात साजरी करावी अशी समस्त शिवसैनिकांसह नागरिकांची प्रबळ इच्छा असल्याने माथेरान मध्ये शिवकाळ अवतरणार असून एकूण वीस घोड्यांवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या आणि मावळ्यांच्या वेशात युवक दिसणार आहेत. बालशिवाजी, राणी लक्ष्मीबाई, अशी रूपे साक्षात शिवजयंतीच्या निमित्ताने भव्य मिरवणूक नागरिकांना पहावयास मिळणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांचे लेझीम पथक, ढोल ताशांच्या गजरात, फटाक्यांची आतिषबाजी करीत दांडपट्टा, लाठीकाठी, नवनवीन पिरॅमिड पथक, नृत्याविष्कार, संपूर्ण भगवेमय वातावरण निर्मिती, जागोजागी आकर्षक रांगोळ्या काढण्यात येणार आहेत. एक नवा उत्साह आणि नवचैतन्य यावेळी अनुभवायला लाभणार आहे. त्यासाठी आतापासूनच जय्यत तयारी शिवसेनेचे शिलेदार करण्यासाठी सज्ज झालेले दिसत आहेत.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने जिल्ह्यात आरोग्य मेळाव्यांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याच्या निमित्ताने केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्ह्यात दि.१८ ते २२ एप्रिल २०२२ प्रत्येक आरोग्य मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुकास्तरावर आरोग्य मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. या आरोग्य मेळाव्यांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

आरोग्य मेळाव्याकरिता प्रत्येक तालुकास्तरावर पंचायत समिती सभापती यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आलेली आहे. यामध्ये गटविकास अधिकारी, महिला व बालविकास अधिकारी, तालुका शिक्षणाधिकारी, तालुका समाजकल्याण अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक व तालुका आरोग्य अधिकारी हे सदस्य आहेत. या मेळाव्याचा शुभारंभ स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या आरोग्य मेळाव्यांमध्ये स्त्रीरोगतज्ञ, बालरोगतज्ञ, अस्थिरोग, नेत्ररोग, कान-नाक-घसा तज्ञ, दंतशल्यचिकित्सक, भिषक अशा विविध वैद्यकीय तज्ञांमार्फत मोफत वैद्यकीय उपचार केले जाणार आहेत. तसेच आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत नागरिकांना युनिक हेल्थ आयडी तयार करून दिले जाणार आहेत. पात्र नागरिकांसाठी आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत आयुष्मान भारत कार्ड मिळवून देण्यासाठी मदत केली जाणार आहे. विविध संसर्गजन्य आणि असंसर्गजन्य आजाराच्या प्रतिबंधासाठी नागरिकांना आरोग्य शिक्षण दिले जाणार आहे.

तसेच या आरोग्य मेळाव्यांमध्ये रक्तदान शिबिरे, अवयवदान नोंदणी व एचएलएल लॅबमार्फत मोफत रक्ततपासण्या करण्यात येणार आहेत. रुग्णांना आवश्यकता भासल्यास टेलिकन्स्ल्टेशनची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या आरोग्य मेळाव्यांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आपल्या तालुक्यातील नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालय येथे नोंदणीसाठी संपर्क साधावयाचा आहे.

आरोग्य मेळाव्यांसाठी जिल्ह्यातील शासकीय विभाग, स्वयंसेवी संस्था, नागरी संस्था यांचा सहभाग घेण्यात येणार आहे. तरी या आरोग्य मेळाव्यांचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे यांनी केले आहे. आरोग्य मेळाव्याचे वेळा-पत्रक पुढीलप्रमाणे: दि.१८ एप्रिल २०२२, वेळ: सकाळी ०९ ते दुपारी ०४.००, स्थळ: उपजिल्हा रुग्णालय-पनवेल, ग्रामीण रुग्णालय-चौक, ग्रामीण रुग्णालय-महाड, ग्रामीण रुग्णालय-पोलादपूर, प्राथमिक आरोग्य केंद्र-तळा दि.१९ एप्रिल २०२२, वेळ: सकाळी ०९ ते दुपारी ०४.००, स्थळ: उपजिल्हा रुग्णालय-पेण, उपजिल्हा रुग्णालय-कर्जत, प्राथमिक आरोग्य केंद्र-पाली, उपजिल्हा रुग्णालय-माणगाव. दि.२० एप्रिल २०२२, वेळ: सकाळी ०९ ते दुपारी ०४.००, स्थळ: उपजिल्हा रुग्णालय-रोहा, उपजिल्हा रुग्णालय-श्रीवर्धन. दि.२१ एप्रिल २०२२, वेळ: सकाळी ०९ ते दुपारी ०४.००, स्थळ: जिल्हा रुग्णालय-अलिबाग. दि.२२ एप्रिल २०२२, वेळ: सकाळी ०९ ते दुपारी ०४.००, स्थळ: डीसीएचसी बोकडविरा-उरण, ग्रामीण रुग्णालय-म्हसळा, ग्रामीण रुग्णालय-मुरुड.

# अंगारकी संकष्टीच्या धर्तीवर पाली बल्लाळेश्वर नगरी सज्ज

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

राज्यात कोरोनाची लाट ओसरली आहे. शासन निर्बंध शिथिल होऊन धार्मिक स्थळे व मंदिरे दर्शनासाठी खुली करण्यात आलीत. अष्टविनायकाचे प्रख्यात धार्मिक स्थळ असलेल्या पालीत भाविक व गणेशभक्तांची गर्दी उसळत आहे.



कोरोनातील निर्बंध उठल्यानंतरची पहिली अंगारकी संकष्टी मंगळवारी (ता. १९) आहे. त्यासाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट व प्रशासन सज्ज झाले असून, उन्हाळी सुट्यांमुळे हजारो भक्त पाली बल्लाळेश्वर नगरीत दाखल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पालीत मुंबई, पुणे, ठाणे, मुंबई उपनगर व रायगड कोकणातील विविध भागातून नागरिक मोठ्या संख्येने पालीत दाखल होतात. भाविकांची खाजगी वाहने व बसेस येत असल्याने वाहतूक कोंडीची समस्या भेडसावते, वाहतूक कोंडीसह गैरसोय टाळण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. तहसीलदार, पोलीस, मंदिर देवस्थान आणि नगरपंचायतींकडून अंगारकी संकष्टी च्या पार्श्वभूमी वर नीटनेटके व सुसज्य नियोजन केले आहे.

कोरोनातील निर्बंधांमुळे मागील दोन वर्षांतील अंगारकीला गणेश भक्तगणांना मनोभावे दर्शन घेता आलेले नव्हते. गतवर्षी अष्टविनायक तीर्थक्षेत्र वरदविनायक महड व पाली बल्लाळेश्वर मंदिर दर्शनासाठी खुले केले होते, मात्र मंदिरात तीन चार वर्ष पूर्वीसारखी गर्दी नसल्याने स्थानिक व्यावसायिकांचा हिरेमोड झाला. आता मंदिर परिसर गजबजुन जात आहेत. यंदा निर्बंध उठलेले असून अनेक शाळांच्या परिक्षाही संपत आलेल्या आहेत. जोडून शासकीय सुट्ट्या आल्यामुळे पर्यटकांचा अष्टविनायक दर्शनासाठी राबता वाढणार आहे. मंगळवारी होणार्या अंगारकी संकष्टी उत्सवाला हजारोच्या संख्येने भक्तगण दाखल होतील, असा अंदाज आहे. त्यानुसार बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट व प्रशासन , पोलीस यांच्यामार्फत नियोजन करण्यात आले आहे.

पालीत दाखल झालेल्या भाविकांच्या गाड्यांमूळे वाहतुक कोंडी झाली होती. परंतू पाली पोलीस व बल्लाळेश्वर देवस्थानचे सुरक्षा रक्षक वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी प्रयत्न करत होते. दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने पाली पोलीस निरीक्षक विश्वजित काइंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक नाक्यावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. सर्व वाहने भक्तनिवास क्रमांक १ च्या बाजूने वळविण्यात येणार आहेत.

# श्रीवर्धनमध्ये पर्यटकांकडून वातानुकूलित खोल्याना पसंती

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

मागील आठ दिवसांपासून श्रीवर्धन तालुक्यामध्ये पारा मोठ्या प्रमाणावर चढलेला पाहायला मिळत आहे. हवेत उष्म्याचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. ढगाळ वातावरण व हवेतील वाढलेली सापेक्ष आर्द्रता यामुळे वातावरणात एक प्रकारचा धुरकट रंग पाहायला मिळत आहे. दमट हवामानामुळे घाम येण्याचा प्रकार देखील जास्त होत आहे. मागील आठवड्यात १४ एप्रिल पासून सलग सुट्ट्या आल्या होत्या. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांनी मोठ्या प्रमाणावर बुकिंग केली होती. परंतु ज्या पर्यटकांनी वातानुकुलित यंत्रणा असलेल्या खोल्यांची बुकिंग केली नव्हती, अशा पर्यटकांना खूप मोठ्या प्रमाणावर उष्म्याचा त्रास सहन करावा लागला. तर आयत्या वेळी येणारे पर्यटक सुद्धा वातानुकूलित खोलीचीच मागणी रिसॉर्ट किंवा हॉटेल मालकां जवळ करत असल्याचे पाहायला मिळाले. जास्त उष्मा वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे श्रीवर्धन तालुक्यात ३ जून २०२० रोजी आलेल्या निसर्ग चक्रीवादळाने या ठिकाणची झाडे,झुडपे त्याचप्रमाणे मोठे वृक्ष जमीनदोस्त केले आहेत. त्यामुळे उन्हाचा प्रकोप जमिनीवरती जास्त मोठ्या प्रमाणावर जाणवत आहे. श्रीवर्धन समुद्र किनारी वनखात्याच्या अखत्यारित असलेल्या जमिनीवर वीस वर्षापूर्वी सुरूची खूप मोठी लागवड करण्यात आलेली होती. परंतु निसर्ग चक्रीवादळात ही सुरुची सर्व झाडे पडुन गेली आहेत. वादळ होऊन दोन वर्षे झाली तरीही वनविभागाकडून त्या ठिकाणी पुन्हा सुरूच्या झाडांची नवीन लागवड करण्यात आलेली नाही. हिरव्यागार असणार्या सुरूच्या झाडां मुळे त्या ठिकाणी बसल्यानंतर थंड हवेचा आस्वाद पर्यटकांना घेता येत असे. पर्यटकांकडून वातानुकूलित खोलीची मागणी मोठ्या प्रमाणावर होत असल्याने अनेक हॉटेल्स मालक व रिसॉर्ट मालक आपल्या हॉटेलमधील खोल्यांमध्ये वातानुकूलित यंत्रणा बसविण्यासाठी तातडीने लगबग करत असल्याचे पाहायला मिळत आहे.

# सापाला सर्पमित्र दत्तात्रेय सावंत यांनी दिले जीवदान

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**



जांभूळपाडा गावाजवळील टाटाचा माळ येथील गणेश माळी यांच्या हॉटेलमध्ये सशाच्या मोठ्या पिंजऱ्यात सोमवारी (ता.१८) धामण जातीचा साप शिरला होता. या सापाला येथील सर्पमित्र दत्तात्रेय सावंत यांनी शिताफीने पकडून जीवदान दिले.

हा साप पिंजऱ्यात सशाने खोदलेल्या बिळात लपलेला होता. सावंत यांनी हे बिळ खोदून शेपटी पकडून सापाला व्यवस्थित बाहेर काढले. त्यानंतर वनविभागाचे कर्मचारी योगेश साजेकर यांनी या सापाला जंगलात सुखरूप सोडले. मानवी वस्तीत साप आल्यास कोणीही घाबरून जाऊ नये. तसेच सापाला कोणतीही दुखापत न करता जवळच्या सर्पमित्राला बोलवावे असे आवाहन यावेळी सर्पमित्र दत्तात्रेय सावंत यांनी केले.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## शिवाजीराजांच्या गडकिल्ल्यांचे संवर्धन, पहिल्या टप्प्यात आठ मंदिरांचा जीर्णोद्धार

खोदकाम, महावारसा सोसायटीची स्थापना करणे, गड- किल्ल्यांचे संवर्धन इ. विषयांचा समावेश होता. या बैठकीस नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे, सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री अमित देशमुख, सांस्कृतिक कार्य विभागाचे राज्यमंत्री राजेंद्र यड्रावकर तसंच महत्त्वाचे प्रशासकिय अधिकारी उपस्थित होते.

शासनाने प्राचीन मंदिरांचे जतन आणि संवर्धन करण्याचा निर्णय घेतला असून या अंतर्गत पहिल्या टप्प्यात आठ मंदिरांच्या जीर्णोद्धाराबरोबर परिसर विकासाचे काम करण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील धुतपापेश्वर, कोल्हापूर जिल्ह्यातील कोपेश्वर, पुणे जिल्ह्यातील एकवीरा देवी, नाशिक जिल्ह्यातील गोंदेश्वर, औरंगाबाद जिल्ह्यातील खंडोबा, बीड जिल्ह्यातील भगवान पुरुषोत्तम, अमरावती जिल्ह्यातील आनंदेश्वर आणि गडचिरोली जिल्ह्यातील शिवमंदिराचा समावेश आहे.

मंदिराचा जीर्णोद्धार करतांना या मंदिरांचे विकास आराखडे हे मंदिराचे मूळ रुप टिकवून ठेऊन करावे, परिसराचा विकास करतांना भाविकांच्या सोयी- सुविधा, वाहनतळे, स्वच्छतागृहे, जाण्या-येण्याचा मार्ग यांचाही विचार व्हावा तसेच याठिकाणी असलेल्या दुकानांची मांडणीही एकसारखी असावी जेणेकरुन येथे येणाऱ्या भाविकांची गैरसोय टाळता येईल, असं मुख्यमंत्री म्हणाले.

एकवीरा देवीच्या मंदिराला जाण्यासाठी रोप वे ची सुविधा उपलब्ध करून देतांना भाविकांना कमीत कमी पायऱ्या चढाव्या लागतील याचाही यात विचार व्हावा, ज्याठिकाणी बसविण्यात येणाऱ्या सरकत्या जिन्याची तसेच रोप वेची सुरक्षितता अभ्यासली जावी.

कोपेश्वर मंदिराला दरवर्षी पुराच्या पाण्याचा वेढा पडतो. त्यामुळे मंदिराचे होत असलेले नुकसान कसे थांबवता येईल यादृष्टीने अभ्यास करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या तसेच या मंदिराची आताची तातडीची गरज लक्षात घेऊन त्याच्या जतन आणि संवर्धनाचे काम हाती घेण्यात यावे असेही मुख्यमंत्री म्हणाले.

या सप्ताहात आठही मंदिराच्या विकास आराखड्याला प्रशासकीय मंजूरी देण्याची कार्यवाही पूर्ण होईल अशी माहिती बैठकीत देण्यात आली. यातील पाच मंदिरांच्या जीर्णोद्धाराचे काम करतांना भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाची मान्यता आवश्यक आहे तर काही ठिकाणी वन विभागाचीही काही कामांसाठी मान्यता घ्यावी लागणार आहे. त्यावर बोलतांना मुख्यमंत्र्यांनी हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा, अशा सूचनाही यावेळी दिल्या.

## मुरूडच्या मच्छीमारांवर अस्मानी, पर्ससीन, एलईडी नंतर जेलिफिशचे अरिष्ट

दिली. सरकार कडून आम्हाला मदतीचे कोणतेही पॅकेज नाही. परन्तु आमच्या सारख्या सामान्य मच्चीमारांची कोणतीही दखल सरकार घेत नसल्याने मच्छीमारांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

समुद्रात अचानक जेलिफिश कसे येतात या बाबत निश्चित ठोस कारण नाही. मात्र जेलिफिश आल्या नंतर अन्य मासळी अजिबात मिळत नाही. यामुळे वर्षभरात केवळ ३ महिनेच मच्छीमारी होते असे दिसून येते. मच्छीमारी व्यवसायातुन हाजारो कोटींची उलाढाल आणि परकीय चलन देशाला मिळत असते. त्याच उद्योगाकडे सरकारचे दुर्लक्ष होत असल्याने पारंपरिक मच्छिमार संतापला आहे.

मुरूड व एकदरा येथील मच्छीमार रात्री ११ वाजता १० ते १५ वाव समुद्रात मासेमारीस जाऊन दुसऱ्या दिवशी सकाळी १० वाजता मुरूड किनाऱ्यावर परत येतात. डिझेल देखील सुटत नाही एवढी देखील मासळी मिळत नाही, ८० टक्के जेलिफिश जाळ्यात मिळतात. त्या मुळे मुरूड मार्केट मध्ये नेमकीच मासळी दिसून येते. समुद्र उशाशी असूनही मुरूड मार्केट मध्ये पालघर, डहाणू आणि अन्य भागातून बर्फातील मासळी विक्रीस येते या वरून मासळी दुष्काळीची गंभीरता लक्षात येते. घरचा प्रपंच किंवा उदरनिर्वाह कसा चालवयाचा असा सवाल रोजच येथील मच्छीमार बांधवांना पडत असल्याचे कोळीवाड्यातून दिसून येत आहे.

# नम्र पणाने भक्ती केली तर सुख मिळते : ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पाटील

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

आळंदी मध्ये जोग महाराजांचा स्वतंत्रपूर्वीचा काल त्या काळात जोग महाराजांकडे एक सावकार आला व जोग महाराजांना म्हणाला मी तुम्हाला एक लाख रुपये देतो त्या पैश्याचे तुम्ही काही करा त्या पडत्या काळात ही जोग महाराजांनी ते पैसे घेण्यास नाकारले तेव्हा तो सावकार जोग महाराजांना म्हणाला कि मी एक लाख रुपये देणारा जगात पाहिला माणूस असेल पण त्यावर जोग महाराज यांनी उत्तर दिले कि तुम्ही पैसे देणारे जगातील एकमेव माणूस आहात परंतु या पडत्या काळातही पैसे न घेणारा एकमेव माणूस आहे.त्याने नम्र पणाने भक्ती केली म्हणून ते सुखी झाले.या जगद्गुरू तुकाराम महाराज यांच्या अभंगाच्या आधारे ह.भ. प. ज्ञानेश्वर महाराज पाटील यांनी आयोजित किर्तन सेवेत स्पष्ट केले.

यावेळी गायनाचार्य रविंद्र मरवडे, गणेश दिघे, दळवी महाराज, ज्ञानेश्वर दळवी, महादेव महाबळे, प्रदीप महाबळे, जेष्ठ नेते तान-ाजी जाधव, गोवे ग्रामपंचायत सरपंच महेंद्र पोटफोडे, खांब विभागीय अध्यक्ष नरेंद्र जाधव, माजी उपसरपंच नितीन जाधव, संदीप जाधव, ग्रामपंचायत सदस्य नरेंद्र पवार, शांताराम पवार, सुधीर दिघे, रामचंद्र पवार, दिनकर दहिंबेकर, राजेश शिर्के, रामा गुजर, हरिचंद्र जाधव, मनोहर मांजरे, रामचंद्र कापसे, कोलाड पंचक्रोशीतील असंख्य नागरिक, गोवे ग्रामस्थ, महिला मंडळ व तरुण वर्ग उपस्थित होते.

रोहा तालुक्यातील मौजे गोवे येथे सालाबाद प्रमाणे हनुमान जयंती उत्सवानिमित्ताने श्री सत्यनारायणाची महापूजा, किल्ला व कोलाड विभाग वारकरी संप्रदाय यांचा हरिपाठ,रात्री ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज पाटील खानावकर (खोपोली )यांची किर्तन सेवा, नंतर हरि भजनाचा कार्यक्रम तसेच दुसऱ्या दिवशी पालखी सोहळा भक्तीमय वातावरणात आयोजित करण्यात करण्यात आला.

सर्व कार्यक्रम यशस्विकरण्यासाठी गावकमेटी अध्यक्ष नामदेव जाधव, सचिव श्रीधर गुजर, उपसचिव प्रवीण पवार, खजिनदार कमलाकर शिर्के, उपखजिनदार सुरेश जाधव(पोलिस पाटील), सदस्य बळीराम जाधव, राजेंद्र जाधव, शंकर दहिंबेकर, रमेश वारकर, पांडुरंग शिर्के, सुरेश जाधव, शांताराम घरट, नथुराम मांजरे, लीलाधर दहिंबेकर, किसन ठाणेकर, दिनेश पवार,नितीन वारकर, जयसिंग पवार, शैलेश पवार, सर्व रेल्वे कर्मचारी तसेच ग्रामस्थ मंडळ, तरुण वर्ग, महिला मंडळ मेहनत घेतली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः सुनील कृष्णाजी पोतदार यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ संपादक : राकेश दिलीप पितळे R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## त्रिकुटाने केली वॉचमनला मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करंजाडे वसाहतीमध्ये तिघा जणांनी दारू पिऊन विनाकारण दहशत निर्माण करण्यासाठी रिलायन्स स्टोअर बाहेर असलेल्या मोटारसायकलीची तसेच कर्तव्यावरील वॉचमनला शिवीगाळ करून मारहाण केली त्याचप्रमाणे रिलायन्स स्टोअरमधील २ संगणकाचे व एका सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्याचे नुकसान केल्याची घटना घडली असून याबाबत पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

करंजाडे येथे राहणारे कुणाल मोर व त्याच्या दोन साथीदारांनी रिलायन्स स्मार्ट सेक्टर ३ येथे रात्रपाळी करतेवेळी असलेल्या वैभव चौधरी यांच्या मोटरसायकलीचे लोखंडी रॉडच्या नुकसान केले त्याचप्रमाणे वॉचमनला शिवीगाळ करून मारहाण केली त्याचप्रमाणे रिलायन्स स्टोअरमधील २ संगणकाचे व एका सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्याचे नुकसान केल्याबद्दल याबाबत पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पनवेल तालुका महिला पत्रकार विकास मंच आयोजित तो मधील ती चा प्रवास (फॅशन शो)

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका महिला पत्रकार विकास मंच यांच्यातर्फे दि.८ मे २०२२ रोजी रात्री ८.३० वाजता आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह पनवेल येथे तो मधील ती चा प्रवास (फॅशन शो) एलजीबीटीक्यू (तृतीयपंथी) समुदाय एकत्रीकरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमास महंत शिवलक्ष्मी आईसाहेब संजय झाल्टे (मनमाड) यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

त्यानिमित्ताने प्रतिष्ठीत मान्यवरांचे सन्मान व समाजप्रबोधन करण्यात येईल अशी माहिती अध्यक्षा सुमेधा लिम्हण, सचिव आदिती ढवळे, उपाध्यक्षा कोमल डांगे, सदस्य दिपाली पारस्कर व नुतन पाटील यांनी दिली.

## तुळसाबाई यांचे दु:खद निधन

**दै.रायगड नगरी । उरण**



उरण तालुका दैनिक पत्रकार संघाचे अध्यक्ष यांच्या ज्येष्ठ वहिनी तूळसाबाई किसन ठाकूर (६४) यांचे रविवारी (१६ ) सकाळी घोडबंदर किल्ला, मीरा- भाईदर येथील राहत्या घरी अल्पशा आजाराने दुखद निधन झाले आहे.

त्यांच्यावर घोडबंदर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# माथेरानच्या वनसमिती आणि वनखात्यांचे वाहन पार्किंगकडे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरानचे प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावरील जागा ही वनखात्याच्या अखत्यारीत येत असल्याने संयुक्त वनव्यवस्थापन समितीच्या माध्यमातून वाहन कर आकारणी केली जात असते. ही समिती फक्त वाहन कर घेण्यात व्यस्त दिसत असून येणारी खाजगी वाहने कशापद्धतीने पार्क केली जात आहेत पर्यटकांना गाड्या पार्क करण्यासाठी जागा उपलब्ध आहे की नाही याकडे नेहमीच दुर्लक्ष असल्याच्या तक्रारी येत आहेत. पर्यटक आपल्या किमती गाडया अनेकदा जागेअभावी कुठेही जंगलात पार्क करत असतात गर्दीच्या वेळी तर नवख्या पर्यटकांची खूपच त्रेधातिरपीट उडते. एकीकडे गाडी पार्किंग साठी वेळ खर्ची होत असतो त्यामुळे इथे येऊन आपण चुकी तर केली नाही ना असेच सूर त्यांच्या कडून ऐकावयास मिळतात. याचाही इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होताना दिसून येत आहे. माजी नगरसेवक चंद्रकांत जाधव यांनी आपल्या शिष्टमंडळासह याठिकाणची परिस्थिती पाहून तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

वनसमितीने आजवरच्या कार्यकाळात विविध पॉईंट्स च्या सुशिभिकरणाकडे लक्ष केंद्रित केले होते.केवळ समितीच्या सदस्यांना कामे देऊन आपला कार्यभाग पूर्ण केला आहे.परंतु मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर पार्किंग अभावी पर्यटकांना कोणत्या समस्यांना सामोरे जावे लागते याकडे दुर्लक्ष केले आहे. निदान यापुढे तरी पर्यटन वृद्धी साठी वनसमितीने पर्यटकांना बारकाईने सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तत्परता दाखवावी असे स्थानिकांमधून बोलले जात आहे.

यावेळी बोलताना मा.नगरसेवक चंद्रकांत जाधव यांनी सांगितले की, दस्तुरी नाक्यावरील पार्किंग व्यवस्थापनेच्या शून्य नियोजन अभावी पर्यटकांना नाहक त्रासाला सामोरं जावं लागत असून स्थानिक प्रशासनाने यावर अधिकाधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज एका वाहन चालकाने चुकीच्या ठिकाणी गाडी लावून गाडीतील पर्यटकाला अमन लॉज पर्यंत सोडण्यास आल्यामुळे एका उच्चभ्रू पर्यटकाला बराच वेळ घालवावा लागला. त्यांना वेळेत ऑफिसला पोहोचायचं होत. वाहन स्थळावरील व्यवस्थापनाने सुद्धा गाड्या व्यवस्थित लावल्या जातात का ,लावलेल्या गाड्या सुरक्षित आहेत का, परतीच्या व गर्दीच्या वेळेस त्या पार्किंगमधून काढण्यास मार्गदर्शन होणे गरजेचे आहे एकदा पार्किंगच्या पावत्या फाडल्या की तिकडे ढुंकूनही पाहत नसल्याचे निदर्शनास येत आहे या छोट्या छोट्या भेडसावणाऱ्या समस्या पर्यटकांना खूप डोकेदुखी ठरत आहेत. याकामी स्थानिक प्रशासनाने याबाबत जास्तीत जास्त लक्ष घालून पर्यटकांना होणाऱ्या त्रासातून मुक्त करणे गरजेचे आहे.

# नळपाणी पुरवठा योजनेचे उदघाटन, महिलांच्या चेहऱ्यावर उमटले हसू



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुका हा आदिवासी बहुल तालुका असून येथील दुर्गम दुर्लक्षित व डोंगर कड्या कपारीत वसलेल्या शेकडो आदिवासी वाड्या पाड्या गावांना मुबलक पाणीपुरवठा व्हावा यासाठी प्रयत्न केले जातायत. प्रशासनाला याकामी स्वदेश फाउंडेशनची मोलाची साथ लाभली आहे. बौद्ध विकास मंडळ पाछापूर पंचशीलनगरात सोलर नळपाणी पुरवठा योजनेचे नुकतेच उदघाटन करण्यात आले.

यावेळी शेकाप नेते तथा जि प सदस्य सुरेश खैरे म्हणाले की पाणी हे जीवन आहे, मानवी वस्तीत मुबलक व शुद्ध पाणीपुरवठा व्हावा यासाठी आम्ही कायम प्रयत्नशील आहोत. विकासकामांमध्ये नळपाणी पुरवठा योजना राबविण्यावर विशेष भर दिला जातोय. पंचशीलनगरमधील या योजनेला लवकरच आरसीसी मध्ये पाण्याची टँक बनवून देऊ असे खैरे यांनी आश्वाशीत केले. यावेळी तहसीलदार दिलीप रायन्नावार यांनी पंचशीलनगराचा सर्वांगीण व शाश्वत विकास होत असल्याचे समाधान व्यक्त केले.

तसेच स्वदेश फाउंडेशन चे शिवदास पायल यांनी सदर योजनेची माहिती दिली. यावेळी शेकाप नेते सुरेशशेठ खैरे, तहसीलदार दिलीप रायन्नावार, सुधागड तालुका बौद्धजन पं म कमिटी अध्यक्ष भगवान शिंदे, प्रभाकर गायकवाड, स्वदेश फाउंडेशन व्यवस्थापक शिवदास पायल,अमूल त्रिभुवन, सिद्धांत गायकवाड, राहुल महाडिक,मधुकर महाडिक, विजय महाडिक , ग्रामविकास समिती पंचशीलनगर, बौद्ध विकास मंडळ पंचशीलनगर ग्रामस्थ उपस्थित होते.

# मुरुड राष्ट्रवादी कार्यकारिणीचे मनोमिलन : विजय पैर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**



मुरुडमध्ये तालुक्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या तालुका अध्यक्षांसह सर्व कार्यकारिणीने मागील आठवड्यात तडकाफडकी राजीनामा दिला होता.त्यामुळे शहरासह तालुक्यात खळबळ उडाली होती.सदरचे वृत्त वृत्तपत्रातून देण्यात आले होते .राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने याची दखल घेऊन श्रीराम नवमीच्या मुहूर्तावर रोहा-सुतारवाडी येथे झालेल्या बैठकीत अखेर तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांच्यासह कार्यकारिणीवर शिक्कामोर्तब होऊन खासदार सुनील तटकरे यांच्या प्रयत्नातांना यश आले असल्याची माहिती तालुका सचीव विजय पैर यांनी दिली.

सुतारवाडी येथे दि.१० एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत खासदार सुनील तटकरे यांनी सर्वांना आपापल्या मनात खंत असल्याबाबत मनमोकळेपणाने भावना व्यक्त करण्यास सांगितले असता इम्तियाज मलबारी, विजय पैर,अतिक खतीब, अविनाश (बाबा) दांडेकर यांच्यासह मंगेश दांडेकर यांनी आपली भूमिका मांडली.यावर आपल्या मताशी सहमत असून मुरुडचा विकास हिच माझी भूमिका होती आणि यापुढेही राहील.मी नेहमीच तुमच्या पाठीशी होतो आणि यापुढे सुद्धा राहिन.यावर कुणाच्या मनात दुमत असू नये.असे स्पष्ट केले. यावेळी मुरुड तालुक्याच्या विकासासाठी ८० लाखांचा निधी उपलब्ध करून खासदार सुनील तटकरे यांनी कामाची यादी मंगेश दांडेकर यांच्याकडे सुपूर्द करून बैठकीची सांगता गोड केली.

या बैठकीनंतर लगेच मुरुड मध्ये घेण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या सभेत कार्यकारिणी कायम करण्यात आली.यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या मुरुड तालुका अध्यक्षपदी मंगेश दांडेकर, उपाध्यक्षपदी हाफिजूल कबले, दिनेश बापलेकर, तालुका युवक अध्यक्षपदी मनीष माळी,शहर अध्यक्षपदी विजय भोय, तालुका चिटणीस विजय पैर, तालुका सहचिटणीस इम्तियाज मलबारी, विभागीय अध्यक्ष पदी योगेंद्र गोयजी, आदेश भोईर, मंगेश शेट्टी, जमीर बकवाल यांची तर महिला तालुका अध्यक्षपदी ड.मृणाल खोत, महिला शहर अध्यक्षपदी प्रमिला माळी व महिला युवती अध्यक्षपदी श्रद्धा चोगले यांची निवड कायम करण्यात आली.

# पनवेलमध्ये श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविड काळात गेली दोन वर्षे हनुमान जयंती उत्सव जल्लोषात साजरा झाला नव्हता, यावेळी कोविडचे बंधन नसल्याने मोठ्या जल्लोषात व उत्साहात हनुमान जन्मोत्सव लाईन आळी, पनवेल येथील श्री हनुमान मंदिरात साजरा झाला. हजारोंच्या संख्येने दिवसभरात भाविकांनी दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घेतला.

हनुमान जयंतीनिमित्त सकाळी श्री देव हनुमंताची विधिवत पूजा-अर्चा व जन्माचा पाळणा म्हणून उत्सवाची सुरवात झाली. तसेच संध्याकाळी मंगल वाद्य वाजवून सातारकर बंधूनी आपली सेवा केली, त्यानंतर महाआरती व रात्री हनुमान प्रासादिक भजन मंडळ,पनवेल तर्फे सुश्राव्य भजन करण्यात आले.यावेळी सप्रेबुवा, बबन बुवा मढवी, अस्वले, रानडे बंधू, सुधाकर पाटील सारडेकर, गावंड बुवा, आदी भजनी बुवांच्या वतीने भजन सेवा करण्यात आली.

यावेळी हनुमान मंदिर देवस्थानचे अध्यक्ष अनिल कुरघोडे, उपाध्यक्ष रवींद्र पडवळ, सेक्रेटरी राजेंद्र घुले, खजिनदार शेखर गायखे, पुरुषोत्तम पटवेकर, चद्रकांत घुले, अनिल टेमघरे, सुनील कुरघोडे, अभिजित चव्हाण, कुणाल कुरघोडे, राजेंद्र आमले, प्रमोद कुरघोडे, बबन मढवी, गुजराती, अशोक पडवळ,आदी देवस्थानचे विश्वस्थ व सेवेकरी उपस्थित होते.



# माथेरानमध्ये हनुमान जन्मोत्सव आनंदाने साजरा

**दै.रायगड नगरी । माथेरान**

मागील दोन वर्षात कोरोनाचे सावट असल्याने सण साजरे करता आले नाहीत. रामनवमी ते हनुमान जन्मोत्सव हा सप्ताह भाविकांसाठी पर्वणीच असते. नुकताच कोरोनाचे संकट टळले असल्याने भाविक सर्व सण साजरे करताना दिसत आहेत.माथेरान ग्रामस्थ उत्सव मंडळाच्या वतीने आणि स्थानिकांच्या सहकार्याने हा सप्ताह आनंदाने साजरा करण्यात आला. हनुमान जन्मोत्सव वेळी श्री हनुमानाची पालखी श्रीराम मंदिरातून काढण्यात आली.यावेळी ग्रामस्थ मोठया संख्येने सहभागी झाले होते.

टाळ मृदुंगाच्या गजरात, बाळगोपालांसह आबालवृद्ध देखील यात सामील होऊन फुगड्या तसेच गाऊन नाचून सुश्राव्य भजन गात होते. ग्रामस्थ उत्सव मंडळाचे अध्यक्ष विकास पार्टे,विठ्ठल पवार, अनंत शेलार, नंदू बुवा साबळे, मुकेश तोरणे, निलेश मढये,भालचंद्र सावंत, कोकण वासीय समाज अध्यक्ष शैलेंद्र दळवी, चंद्रकांत सुतार, प्रदीप रांजणे, अनंत केतकर, प्रकाश सुतार, माजी नगरसेवक राजेश दळवी, नितीन शेळके,सागर जोशी,माजी लोकप्रतिनिधी त्याचप्रमाणे विविध मंडळाचे पदाधिकारी,महिला वर्ग,ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते आहे की, मुळ मालक **श्री.केशव काशिनाथ म्हात्रे व श्री.मच्छिंद्र काशिनाथ म्हात्रे,** रा.खुटारी, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड यांची मालकीची, हक्काची, जमीन मिळकत ही मौजे : रोहिंजण, पो.तळोजा, ता.पनवेल, जि.रायगड येथील असून सदरहू मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ५२ | ५ | ००.४३.९<br>पो.ख.0.0१.६<br>एकूण 0.४५.५ | ८.१२ |

मुळ मालक यांच्या ताबेकब्जात असलेली वर उल्लेख केलेल्या मिळकती संदर्भात मे.दिवाणी न्यायालय व.स्तर यांचे न्यायालयात वरील मुळ मालक यांनी दावा मिळकतीचे दि.२८/०७/२००४ रोजीचा उरण येथील दस्त क्र.५२६१/२००४ हा खरेदीखत रद्द करून मिळण्याकरिता, डिक्लरेशन करिता व निरंतर व तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरिता असा दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्याच्या क्र.रे.मु.नं.१६६/२०२१ असा असून तो न्यायप्रविष्ठ आहे. तरी सदरहू मिळकती संदर्भात कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये असे केल्यास तुमच्या होणाऱ्या नुकसानीस तुम्हीच जबाबदार राहणार असाल याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/०४/२०२२

**सही/-**
**ॲड.राकेश विठ्ठल केणी**
**अंबिका आर्केड, को.ऑ.हौ. सो., शॉप नं.६, प्लॉट नं.५५१, लोखंडीपाडा, ता.पनवेल, जि.रायगड**

---

भाकरे साहेब कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील : ॲड.सुनील एन. मोरे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज नं.३०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.०८/०६/२०२२

**श्रीमती.सुनयना विजय पाटील**
वय : ३४ वर्षे, व्यवसाय : घरकाम
रा.रुम नं.२०४, दुसरा मजला, भूखंड क्रमांक-९८,
नावडे फेज-२, श्री गणेश को.ऑप.हौसिंग सोसायटी,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८ — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

याद्वारे जाहीर करण्यात येते की, पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयातील दिवाणी चौकशी अर्ज नं.३०/२०२२ नुसार अर्जदार या **कुमार.निशाद विजय पाटील,** वय : ६ वर्षे, या अज्ञान बालकांच्या आई असून हिंदू मायनॉरिटी ॲक्ट नुसार त्यांच्या नैसर्गिक पालनकर्त्या आहेत. अर्जदार या **कुमार.निशाद विजय पाटील** यांच्या हिश्याची रुम नं.२०४, दुसरा मजला, भूखंड क्रमांक-९८, नावडे फेज-२, श्री गणेश को.ऑप.हौसिंग सोसायटी, ता.पनवेल, जि.रायगड ही मिळकतीची विक्रीची परवानगी घेत असून सदर मिळकतीस कोणाचेही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत आपला हक्क हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेवून किंवा दि.०८/०६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे, अन्यथा कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन मे.कोर्ट पुढील कारवाई करेल. सदर नोटीस आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्यासह दिले.

**सही/-** **क.लिपीक** **अति.जिल्हा.न्याया, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-** **सहा.अधिक्षक** **अति.जिल्हा.न्याया, पनवेल**

---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्यांचे विद्यमान मालक **१) राजाराम गजानन कोळी २) मुकूंद नारायण कोळी** यांचेकडून कायमस्वरुपी मिळकत घेण्याबाबत व्यवहार आमच्या अशिलांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस देण्याबाबत विद्यमान मालकांनी संमती दिलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : विंधणे, ता.उरण, जि.रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | भूधारण पद्धती | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| २०७ | २/ब | वर्ग-१ | 0-९४-२0<br>पो.ख. 0-0४-५0<br>एकूण 0-९८-७0 | 0.0५.00 |

वर वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व ताबे कब्जाची आहे. सदरील मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने दिल्यावरुन आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविला आहे. सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण, दान, लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहर, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधितांच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडेही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आणून द्यावी. या प्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून आम्ही सदर व्यवहार पूर्ण करू व नंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही हे सर्वांस कळावे.

दिनांक : १९/०४/२०२२

**सही/-**
**ॲड.टी.एन.त्रिपाठी (हायकोर्ट)**
**ए विंग, अगरवाल ट्रेड सेंटर, ऑफिस नं.८५/८६, ८ वा मजला, प्लॉट नं.६२, सेक्टर ११, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**

---

## CAUTION NOTICE

THE PUBLIC AT LARGE IS HEREBY BROUGHT TO NOTICE that We, M/s. Rasayani Hotel Pvt. Ltd., are the owners and in exclusive use and possession of a N.A. Plot of Land along with the building structures standing thereon along with open spaces, stones, Gadka stones, waters, springs, all appurtenances, members of appurtenances, easements, rights, etc situated at Karade Khurd and which is also included within the Grampanchayat limits of Karade Khurd, Tal. Panvel, Dist. Raigad, bearing Survey No.142/23 Area 0 Hectors 46.34 Ares, which is equivalent to 4634 Sq. Mtrs, Assessed at Rs.92.68 ("Plot of Land").

We have recently come to know that someone, representing on behalf of M/s. Rasayani Hotels Pvt. Ltd is trying to negotiate the disposal, sell or transfer of the said Plot of Land with the help of local broker to any intended purchaser or directly deal with the intended purchasers by entering into documents such as MOU, Agreement for Sale, LOI, etc.

The Public at large is made aware that the said company has three directors, and the company has not authorised by way on any resolution or otherwise to any director, in its individual capacity or otherwise, to deal with or dispose off or sell or transfer off, the said Plot of Land to any intended purchasers.

The Public is therefore cautioned against buying/dealing with said Plot of Land by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, inheritance, possession, lease, and lien or otherwise, wherein Rasayani Hotel Pvt. Ltd have any interest/ rights, directly or indirectly and in case the said deal is proceeded with the same will be treated as hollow, null and void and not binding on my client. Please further note that we, reserve our right to take such legal action, civil or criminal including claiming damages from anyone, who attempts to either engage themselves in the dealing with the said Plot of Land, under any law throughout the world solely at their cost and consequences. Any infringement of our right, title and interest in the with the said Plot of Land will attract penal action as per law of the land which please carefully note

Dated this 19th day of April 2022

**Sd/-**
**Mr. Hanumant R. Bankar**
**Advocate**
**Balaji Homes, Shop No.14, F/6, D- Wing, Sector 10, Near Trimurti Hotel, Vashi. Navi Mumbai – 400703**

## CAUTION NOTICE

THE PUBLIC AT LARGE IS HEREBY BROUGHT TO NOTICE that We, M/s. Rosewood Resorts & Club Pvt. Ltd., are the owners and in exclusive use and possession of a N.A. Plot of Land along with the building structures standing thereon along with open spaces, stones, Gadka stones, waters, springs, all appurtenances, members of appurtenances, easements, rights, etc situated at Karade Khurd and which is also included within the Grampanchayat limits of Karade Khurd, Tal. Panvel, Dist. Raigad, bearing Survey No.142/21 admeasuring area 10580 Sq. Mtrs. Assessed at Rs.211.60 and Survey No.142/22 admeasuring area 1199 Sq. Mtrs. ("Plots of Lands").

We have recently come to know that someone, representing on behalf of M/S. Rosewood Resorts & Club Pvt. Ltd is trying to negotiate the disposal, sell or transfer of the said Plot of Land with the help of local broker to any intended purchaser or directly deal with the intended purchasers by entering into documents such as MOU, Agreement for Sale, LOI, etc.

The Public at large is made aware that the said company has two directors, and the company has not authorised by way on any resolution or otherwise to any director, in its individual capacity or otherwise, to deal with or dispose off or sell or transfer off, the said Plot of Land to any intended purchasers.

The Public is therefore cautioned against buying/dealing with said Plot of Land by way of sale, exchange, gift, mortgage, charge, trust, inheritance, possession, lease, and lien or otherwise, wherein M/S. Rosewood Resorts & Club Pvt. Ltd have any interest/ rights, directly or indirectly and in case the said deal is proceeded with the same will be treated as hollow, null and void and not binding on my client. Please further note that we, reserve our right to take such legal action, civil or criminal including claiming damages from anyone, who attempts to either engage themselves in the dealing with the said Plot of Land, under any law throughout the world solely at their cost and consequences. Any infringement of our right, title and interest in the with the said Plot of Land will attract penal action as per law of the land which please carefully note

Dated this 19th day of April 2022

**Sd/-**
**Mr. Hanumant R. Bankar**
**Advocate**
**Balaji Homes, Shop No.14, F/6, D- Wing, Sector 10, Near Trimurti Hotel, Vashi. Navi Mumbai – 400703**

# संक्षिप्त...

## अज्ञात वाहनाच्या धडकेने इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात वाहनाच्या धडकेने एका इसमाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील टीपॉइंट येथे पळस्पे फाटा ते जेएनपीटी लेनच्या ब्रिज उतरतेवेळी घडली आहे.

सचिन सावंत (वय ३६) राहणार खारघर असे या व्यक्तीचे नाव असून अज्ञात वाहनावरील चालकाने त्यांच्या स्कूटीगाडीला धडक दिल्याने झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाला आहे. याबाबत अज्ञात वाहकाविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पुई येथे हनुमान जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांनी संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब–रोहा**

सालाबादप्रमाणे याही वर्षी रोहे तालुक्यातील पुई या गावी शुक्र. दि.१५ व शनि. दि.१६ रोजी हनुमान जयंती विविध प्रकारच्या धार्मिक, अध्यात्मिक तथा सामाजिक कार्यक्रमांनी मोठ्या उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न करण्यात आली. जय हनुमान सांस्कृतिक क्रीडा मंडळ व ग्रामस्थ मंडळ पुई यांच्या संकल्पनेने संपन्न झालेल्या या जयंती सोहळ्या प्रसंगी शुक्र. दि.१५ रोजी स.८ ते १० वा.केदारनाथ जोशी (शिरवली) यांच्या हस्ते देवता अभिषेक सोहळा,शनि. दि.१६ रोजी सूर्योदयास श्री. हनुमान जन्मोत्सव,तद्नंतर स.१० वा.श्री. सत्यनारायणाची महापूजा,स.११ ते दु.१ या वेळेत ह.भ.प.राम महाराज आंबेकर व ह.भ.प.हरिश्चंद्र महाराज धामणसे यांच्या नेतृत्वाखाली श्री. ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे ९ व १२ व्या अध्यायाचे सामुदायिक पारायण,सायं.५ ते ६ वा.ह.भ.प.अनिल महाराज सानप वरसगांव यांची प्रवचन सेवा,६ ते ७:३० या वेळेत महादेववाडी व पंचक्रोशी ग्रामस्थ यांचे हरिपाठ,७ :३० ते ९ वा. पुई ग्रामस्थ यांचे सौजन्याने महाप्रसाद व रात्रौ. ९ ते ११ या वेळेत ह.भ.प.उदय बद्रीमहाराज खारगाव यांची हरिकिर्तनरुपी सेवा आदी कार्यक्रम संपन्न करण्यात आले. या संपूर्ण सोहळ्याचे यशस्वीतेसाठी श्री. क्षेत्रपाल मित्र मंडळ,जय हनुमान सांस्कृतिक क्रीडा मंडळ व ग्रामस्थ मंडळ पुई व महिला मंडळ पुई यांनी मोलाचे सहकार्य केले.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# पैशाची व्हॅन घेवून पसार झालेल्या आरोपीस एनआरआय सागरी पोलिसांनी केले गजाआड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

८२,५०,०००/- रुपयाने भरलेली व्हॅन घेवून पसार झालेल्या आरोपीस अवघ्या २४ तासात एनआरआय पोलीस ठाण्याने ताब्यात घेतले असून सदर आरोपीकडून ८१ लाख ४१ हजार ८०० रुपयाचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.



सदर अटक आरोपीचे नाव संदिप शरद दळवी, वय- ३६ वर्षे, धंदा चालक रा.कोपरखैरणेगांव हे असून त्याने त्याच्या ताब्यातील महींद्रा कंपनीची बोलेरो गाडी क्रमांक एमएच ४३-एडी-६३९३ मध्ये असलेले २,२९,५०००० /-( दोन करोड एकोणतीस लाख पन्नास हजार रूपये ) घेवुन जासई, धुतुम, पिरकोन, नवघर, चारफाटा उरण, करंजा, गव्हाण येथिल विविध बॅकाच्या एटीएम मशिनमध्ये पैसे टाकुन उलवा, बामणडोंगरी रेल्वे स्टेशन समोरील बॅक ऑफ इंडीया च्या एटीएम मषिनमध्ये पैसे टाकण्यासाठी संध्याकाळी ०८:२० वा. सहकार्यासह पोहचला. त्यावेळी त्याचे सहकारी असे पैसे घेवुन एटीएम मशिनमध्ये पैसे टाकत होते. त्यावेळी गार्ड महेश भास्कर हा एटीएम मशिनच्या बाहेर उभा होता. आरोपी संदिप दळवी हा गाडीतच होता. एटीएम मशिन पासुन गाडी सुमारे ५० मीटर अंतरावर उभी होती. फिर्यादी व सहकारी गार्ड सह एटीएम मशिनमध्ये पैसे टाकुन १० मिनिटांनी बाहेर आले असता त्यांनी गाडीची आजुबाजुला पाहणी केली असता त्यांनी गाडी दिसुन आली नाही. त्यावेळी त्यांनी आजुबाजुला शोध घेवुन जी पी एस वर पाहिले असता. गाडी पारसिक हिल येथे असल्याबाबत समजले. त्यावेळी कंपनीने पोलीस नियंत्रण कक्षास माहीती दिली व फिर्यादी व त्यांचे सहकारी तात्काळ अपोलो हॉस्पिटल पारसिक हिल येथे पोहचले असता. त्याठिकाणी पोलीस ही पोहचले होते. परंतु गाडीचा चालक व गाडीतील पैशांची पेटी मिळुन आली नाही. त्यावरून गाडी वरील चालक आरोपी दळवी याने बोलेरो गाडी क्रमांक एमएच ४३-एडी-६३९३ मध्ये असलेले ८२,५००००/- रुपयाची चोरी करुन पळुन गेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्यातील आरोपी चा शोध घेण्यासाठी दोन पथके तयार करण्यात आली होती आरोपीचा शोध घेण्यासाठी घटनास्थळी सीसीटीव्ही कॅमेरे उपलब्ध नव्हते, गुन्ह्यातील साक्षीदार यांच्याकडे चालक हा बदली चालक असल्याने काही एक माहीती नव्हती. त्यामुळे ज्या अतुल मामुनकर यांच्या ओळखीने तो आला होता. त्यांच्याकडे ही खात्री केली परंतु त्याच्याकडे ही आरोपी हा फक्त कोपरखैरणे येथे राहतो एवढीच माहीती होती. व एक बंद फोन नंबर होता. त्या फोन नंबर बाबत लोकेशन मिळत नव्हते परंतु तांत्रिक व सोशल मिडीयावरून आरोपीचा फोटो प्राप्त करून गोपनिय बातमीदाराला दाखवुन आरोपीच्या ठाव ठिकाण्याबाबत सपोनि केकान, पोउपनिरी मंगेष बाचकर, पोउपनि संदेष तांबे व पोलीस पथक यांनी वेळोवेळी माहिती घेवुन अविरत पणे २४ तास शोध घेवुन त्यास पनवेल बस स्टॅन्ड येथुन शिताफिने ताब्यात घेतले. त्याने गुन्ह्याची कबुली दिल्याने त्यास अटक करण्यात आली आहे. यातील अटक आरोपी यांनी चोरी केलेल्या पैशापैकी एकुण ८१,४१,८००/-रू. जप्त करण्यात आले आहेत. गुन्हयातील चोरी केलेल्या रकमेपैकी काही रक्कम खर्च करून उर्वरित रक्कम व पैशांची पेटी ही त्याचे मित्राच्या घरी घरचे सामान आहे असे सांगून त्यास लॉक करून ठेवली होती.

## अखेर एमएमआरडीए मार्फत रस्त्यांची साफसफाई सुरू



**दै.रायगड नगरी । माथेरान**

एमएमआरडीए च्या माध्यमातून माथेरान मध्ये सुरु असलेल्या विकास कामांतील दस्तुरी नाक्यापासून ते महात्मा गांधी मार्गावरील पांडे रोड पर्यंत क्ले पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात येत आहेत.सध्यातरी ह्या रस्त्याची कामे टपाल पेटी नाक्यापर्यंत येत आहेत अद्यापही ही कामे पूर्ण करण्यासाठी अपुऱ्या कामगारांच्या संख्येमुळे वेळ लागणार आहे. ह्याच ब्लॉकच्या रस्त्यावर संबंधीत ठेकेदाराने कच्च्या स्वरूपाचे ब्लॉक लपविण्यासाठी त्यावर मोठया प्रमाणावर ग्रीट टाकल्यामुळे धुळीचे प्रमाण अधिक वाढले होते. याबाबतचे वृत्त प्रसिद्ध केल्यामुळे नाईलाजाने नगरपरिषदेच्या ठेक्यावरील कामगारां मार्फत ह्या रस्त्यांची साफसफाईची कामे सुरू केली होती परंतु सदरचा रस्ता पूर्ण होईपर्यंत एमएमआरडीए ने नगरपरिषदेकडे सुपूर्द केलेला नसल्याने ह्या रस्त्याचे काम पूर्ण होईपर्यंत साफसफाईची सर्वस्वी जबाबदारी एमएमआरडीए ठेकेदाराची होती त्यामुळे एमएमआरडीए च्या कामात राबताहेत नगरपरिषदेचे कामगार हे वृत्त आल्यावर एमएमआरडीए च्या कामगारांमार्फत काहीशा प्रमाणात ह्या रस्त्यावरील ग्रीट काढण्यास सुरुवात केली आहे. धूळ विरहीत रस्त्याला पर्याय म्हणून ब्लॉकचे रस्ते बनविण्यात येत असताना असे उपद्व्याप संबंधीत ठेकेदाराने करून ठेवल्याने त्या धुळीचा त्रास नागरिकांना तसेच पर्यटकांना होत आहे.

## हिंद मराठा महासंघ मुंबई प्रदेश कार्यालयाचे थाटात उद्घाटन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंद मराठा महासंघ मुंबई प्रदेश कार्यालय उद्घाटन राष्ट्रीय संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले सनई चौघडे ढोल ताशांच्या गजरात तुतारी च्या मंजुळ स्वरात आसमंत दणाणून सोडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुंबई प्रदेश अध्यक्ष संजय सावंत तर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष सुधीरराव पालांडे, कोकण प्रदेशाध्यक्ष विनोदराव चव्हाण, राष्ट्रीय उपाध्यक्ष ॲड आनंदराव भोसले, राष्ट्रीय सचिव शिवाजीराव पालांडे, प्रदेश सरचिटणीस प्रवक्ते श्रीकांत चाळके, राज्य सल्लागार प्रवक्ते प्रा संजय शिंदे, महीला अध्यक्षा कोकण ज्योती भोसले, मुंबई प्रदेश अध्यक्ष भक्ति भार्गव भोसले, चित्रपट रंगभूमी विभाग राष्ट्रीय अध्यक्ष निलेश पालांडे, रत्नागिरी जिल्हा संपर्क अध्यक्ष राजेश निकम, कोकण सरचिटणीस संजय रेवणें, रत्नागिरी जिल्हा उप अध्यक्ष विजयराव येरूनकर, बोरीवली उपनगर अध्यक्ष प्रभाकर सुर्वे व शेकडो पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी विश्व वंदनीय शिवराय यांचे पुतळ्यास अभिवादन करून मराठा मेळाव्यास उपस्थित मान्यवर पदाधिकारी यांनी मार्गदर्शन केले.

## महिलांसाठी घरगुती आगी संबंधी प्रशिक्षण



**दै.रायगड नगरी । उरण**

आज देशात अग्नी सुरक्षा आणि अग्नी क्षमन संबंधी माहिती अभावी फार मोठ्या प्रमाणात जीवीत आणि वित्त हानी होते. या अनुषंगाने महिलांना अग्नी सुरक्षा विषयी माहिती उपलब्ध होण्यासाठी अग्नी सुरक्षा सप्ताह च्या निमित्ताने ही आय एस एफ युनिट मुंबई च्या फायर वींग ने ओएनजीसी कॉलनी पनवेल मध्ये राहणाऱ्या ही आय एस एफ कर्मचाऱ्यांच्या परिवारातील महिला/गृहिणीन साठी प्रथमोपचार, आणि अग्निशमन तसेच घरगुती एल पी जी आग वरील सुरक्षा सबंधी प्रशिक्षण शिबिर तसेच थेट अग्निशमन प्रात्यक्षिकांचे आयोजन करण्यात आले होते. या व्यतिरिक्त एक प्रश्नमंजुशा कार्यक्रम आणि बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमा मधे मोठ्या संख्ये ने महिला व मुला मुलींनी सहभाग घेतला होता.

# पनवेलमध्ये रॅम्पवर अवतरली छोट्यांची किलबिल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल स्मार्ट मम्मिज या सेवाभावी संस्थेच्या वतीने लहान मुलांसाठी रॅम्प वॉक अर्थात फॅशन शो चे आयोजन केले होते. पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात रविवारी सायंकाळी हा शानदार फॅशन शो संपन्न झाला. विशेष म्हणजे कर्णबधीर मुलांनी देखील या फॅशन शो मध्ये रॅम्प वॉक करत उपस्थितांची वाहावा मिळवली. भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजेत्यांना क्राऊन बहाल केले. तर माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे आणि काँग्रेसचे रायगड जिल्हा अध्यक्ष तथा इंटक चे राष्ट्रीय सचिव महेंद्र घरत यांची या फॅशन शोला उपस्थिती होती.



पमपाचे विरोधी पक्ष नेते प्रितम म्हात्रे, भाजयुमोचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष विक्रांत बाळासाहेब पाटील, वर्षा प्रशांत ठाकूर, ममता प्रितम म्हात्रे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाला प्रारंभ करण्यात आला. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या मुलांसाठी आठ वर्षाखालील व आठ वर्षावरील ते १३ वर्षांपर्यंत असे दोन गट बनविण्यात आले होते. ग्रुप ए मध्ये पनय वीरा हा प्रिन्स ठरला तर आरोही मजिठीया प्रिन्सेस ठरली. तर ग्रुप बी मध्ये रेनित ठक्कर याला प्रिन्स चे टायटल मिळाले तर वेदिका पवार हिने प्रिन्सेस चे टायटल जिंकले. आमदार प्रशांत ठाकूर यांनी विजेत्यांना क्राऊन बहाल करून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी शीतल ठक्कर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असणाऱ्या पनवेल स्मार्ट मम्मीज या ग्रुपच्या कार्याची प्रशंसा केली. लहान मुलांसाठी आयोजित अशा प्रकारच्या फॅशन शोज मुळे त्यांच्यात आत्मविश्वास बळावेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तर या रॅम्प वरती कर्णबधिर मुलांना देखील फॅशन शोचा आनंद लुटता आला याबद्दल त्यांनी शीतल ठक्कर व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष कौतुक केले.

ग्रुप ए मध्ये मुलांच्यात स्वयम् थोरात दुसऱ्या स्थानी आला तर वेद गांधी याने तिसरा क्रमांक पटकावला. मुलींच्यात अवंतिका धात्रक ही फर्स्ट रनर अप ठरली तर सानवी कदम ही सेकंड रनर अप ठरली. मोठ्यांच्या बी ग्रुप मध्ये मुलांच्यात अथर्व भोईर फर्स्ट रनर अप ठरला तर आराध्य म्हात्रे सेकंड रनर अप ठरला. मुलींच्यात काव्या सोनेटा फर्स्ट रनर अप तर शनाया गांधी सेकंड रनर अप ठरली. याव्यतिरिक्त जियाना मुलजी हिने बेस्ट स्माईल,कियारा जैन हिने बेस्ट अटायर, अमैरा शहा हिने मिस ब्युटिफुल, सानवी कदम हिने बेस्ट वॉक, आरोही पाठारी हिने मोस्ट स्पार्कलिंग आईज ही टायटल पटकावली. मुलांच्यात समर्थ चौहान यास बेस्ट वॉक, पनय विरा बेस्ट अटायर,स्वयम् थोरात बेस्ट फोटोजेनिक फेस, वेद गांधी मोस्ट कॉन्फिडंट,धियांश ठक्कर यास रायझिंग स्टार अशी टायटल मिळाली.

मोठ्या ग्रुप मध्ये सान्वी तडके हिला मोस्ट फोटोजेनिक फेस, जानकी वारिया हिला रायझिंग स्टार, पूर्वा लामतुरे हिला मिस स्टायलिश, रीतन्या म्हात्रे हीला ब्यूटीफुल हेयर, तर स्वरा शिंदे हिला मोस्ट कॉन्फिडन्ट ही टायटल्स देण्यात आली. तर मुलांच्या ग्रुपमध्ये रेनीत ठक्कर याला स्टाईल आयकॉन आणि आराध्य म्हात्रे याला हँडसम हंक हे टायटल देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे रोटरी क्लब संचालित कर्णबधिर मुलांच्या शाळेतील मुलांनी अत्यंत आत्मविश्वासाने रॅम्पवॉक सादर केला. उपस्थित नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात या मुलींचे रॅम्पवर स्वागत केले. स्मार्ट मम्मी च्या वतीने या मुलींना भेटवस्तू देण्यात आल्या. या फॅशन शो साठी डॉक्टर स्वाती हांडे, सोनी ठक्कर, आणि नंदिनी भाटकर यांनी जजेस म्हणून अत्यंत चोख पद्धतीने काम पाहिले.तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शितल ठक्कर यांच्या बरोबरीने नैना बाठीया,निता कोटक,कविता ठाकूर, मेघना भानुषाली, नेहा गांधी यांनी अथक परिश्रम घेतले. तर आपल्या बहारदार आ-वाजात आणि शेरो शायरीच्या अनोख्या बरसातींनी कोमल वीरा यांच्या सूत्रसंचालनाने कार्यक्रमात अनोखा बहर आणला. विविध क्षेत्रातील मान्यवरांसह शेकडो नागरिकांनी या फॅशन शोचा आनंद लुटला.तर वैभव जोशी यांच्या माध्यमातून हजारो प्रेक्षकांनी घरबसल्या या फॅशन शो चा यु ट्युब लाईव्हवर आनंद लुटला.


## म्हसळा तालुका संजय गांधी निराधार योजना समितीची पाहुणचार बैठक संपन्न

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

महाराष्ट्र राज्यमंत्री तथा पालकमंत्री अदिती तटकरे यांचे शिफारशीने गठीत केलेल्या म्हसळा तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीची पहिली पाहुणचार सभा म्हसळा तहसीलदार कार्यालयात समिती अध्यक्ष महेश शिर्के यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

तहसीलदार समीर घारे, नायब तहसीलदार के.टी.भिंगारे यांचे उपस्थितीत आघाडी पक्षाचे नवनियुक्त समिती सदस्य महादेव भिकु पाटील, निशा पाटील, शमीम रियाज फकीह, यशवंत गमरे, मोरेश्वर पाटील, अमर ठमके, शुभांगी पवार, ग्राम विस्तार अधिकारी एस.डी.शिंदे उपस्थित होते.समिती पाहुणचार सभेत समिती अध्यक्ष महेश शिर्के आणि सर्व सदस्यांचे तहसीलदार तथा समिती सचिव समीर घारे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.अध्यक्ष महेश शिर्के यांनी समितीचे कामकाजाबाबत चर्चा करताना सन्मानिय सदस्यांनी आपल्या विभागातील जास्तीत जास्त लाभार्थ्यांपर्यंत पोहोचून संजय गांधी निराधार योजनेचा वंचित लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी आपणहुन लक्ष देऊन प्रस्ताव सादर करावेत जेणेकरून कुठल्याही दुर्गम भागातील लाभार्थी शासकीय अनुदान योजनेपासून वंचित राहू नयेत असे सुचित केले.सद्याच्यास्थितीत म्हसळा तालुक्यात संजय गांधी निराधार अनुदान योजना सर्वसाधारण ८०६,अनु जाती ४९, अनु.जमाती १०, श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजना ५८६, अनु.जाती ८, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना ३०५, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती योजना ११७,इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग नीवृत्ती वेतन १३, इंदिरा गांधी राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना ३ असे एकूण १८९७ लाभार्थी योजनेचा लाभ घेत असल्याची माहिती तहसीलदार समीर घारे यांनी नवनियुक्त समिती सदस्यांना दिली.

## खोपोली बंगाली असोसिएशनतर्फे खोपोली व खालापूर परिसरातील शाळांना लॅपटॉप वाटप



**दै.रायगड नगरी । खोपोली**

बंगाली नववर्ष निमित्ताने क्लब महिंद्रा व खोपोली बंगाली असोसिएशन यांच्या तर्फे खोपोली व खालापूर परिसरातील १० गरजू शाळांना खोपोली काली बारी येथे नुकतेच छोटेखानी कार्यक्रमात लॅपटॉप वाटप करण्यात आले.

यावेळी मा. नगरसेवक जीनी एबीन सॅम्युअल, नितीन पवार, मा. उपनगराध्यक्ष राजू गायकवाड, सहज सेवा फाउंडेशनचे सर्वेसर्वा शेखर जांभळे, मुजफर सर आदी उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते खोपोली हिन्दी विद्यालय मोगलवाडी, रवींद्रनाथ टागोर खोपोली नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ६ मोगलवाडी, लोकमान्य टिळक माध्यमिक विद्यालय वासरंग, खोपोली नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ५ मुळगाव ठाकूरवाडी, डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम उर्दू प्राथमिक शाळा क्रमांक २०, स्वातंत्र्यवीर वीर सावरकर खोपोली नगर परिषद प्राथमिक शाळा क्रमांक ९ चिंचवली, छत्रपती शाहू महाराज माध्यमिक विद्यालय खोपोली, रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नडोदे (खालापूर), रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुंभिवली (खा-लापूर), रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वनवे निंबोडे यांना बंगाली नववर्ष निमित्ताने क्लब महिंद्रा व खोपोली बंगाली असोसिएशन यांच्या तर्फे लॅपटॉप वाटप करण्यात आले.

## नागोठणेच्या विकासासाठी कटीबद्ध : आ.रविशेठ पाटील

**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठणे गावावर माझे पूर्वीपासून प्रेम आहे. मला प्रत्येक निवडणुकीत नागोठणेकरांनी मतदानाच्या स्वरूपात मदत केलेली असुन नागोठणे शहराच्या विकासासाठी मी मंत्री असताना तसेच आता आमदार असतानाही निधी उपलब्ध करून दिला आहे. नागोठणे गावाच्या विकास कामांसाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. नागोठणेच्या विकासासाठी मी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन पेण सुधागड मतदार संघांचे आमदार रविशेठ पाटील यांनी काढले.



भाजपाचे नागोठणे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांच्या आग्रहाखातर आमदार रविशेठ पाटील यांनी मोदी यांच्या निवासस्थानी रविवारी दुपारी भेट दिली त्यावेळी कार्यकर्त्यांशी बोलताना आ. पाटील बोलत होते. आमदार रविशेठ पाटील यांनी नागोठणे गावाच्या विकासासाठी भरघोस निधी दिल्यामुळे शहर अध्यक्ष सचिन मोदी यांनी आमदार रविशेठ पाटील यांचा सत्कार केला त्यांनतर आमदार रविशेठ पाटील यांनी नागोठणे बंगलेआळी येथे नागोठणे ग्रामदैवत श्री जोगेश्वरी माता व श्री भैरवनाथ महाराज यांच्या पालखीचे दर्शन घेतले त्यावेळी उत्सव समितीचे अध्यक्ष नितीन राऊत यांनी आमदार पाटील यांचे स्वागत केले.

दरम्यान नागोठणे ग्रामदेवता श्री जोगेश्वरी माता मंदिर सुशोभीकरणासाठी आमदार रविशेठ पाटील ३ लाख रुपये निधी देणार असल्याची माहिती सचिन मोदी यांनी पत्रकारांना दिली.

यावेळी ज्येष्ठ नेते मारुती देवरे, तालुका सरचिटणीस आनंद लाड, शहर अध्यक्ष सचिन मोदी, सिराजभाई पानसरे, सुभाष पाटील, ज्येष्ठ कार्यकर्ते शामकांत नेरपगार, विवेक रावकर, सुरेश जैन, काशिनाथ दाभाडे, शेखर गोळे, गौतम जैन, तिरतराव पोलसानी, हेमंत लाड आदी कार्यकर्ते उपस्थित होते.